# लावणी : मराठी साहित्यातील शृंगारिक आविष्कार

प्रा दीपक भगवानराव राखुंडे
मराठी विभाग,
मत्स्योदरी महाविद्यालय, अंबड.

प्राचीन साहित्यात संत, पंत आणि तंत हे तीन प्रवाह निर्माण झाले. संतांनी ओव्या अभंगातून समाजमनावर सात्विक संस्कार केले; तर पंत म्हणजे पंडिती कवींनी संस्कृत प्रचूर रचना करून नवरसांचा जाणीवपूर्वक काव्यात वापर केला. तंतुवाद्यावर ज्यांची काव्य प्रतिभा बहरत गेली असे तंत म्हणजे शाहीर! शाहिरी काव्याचे आशय, विषय संत पंत काव्यांपेक्षा भिन्न होते. शाहरी काव्यात विशेषतः वीररस आणि शृंगाररसाची प्रचिती येते. पोवाडा हा वीररसाचा मूर्तीमंत आविष्कार तर लावणी म्हणजे शृंगाररसाची रसदार उधळण.ज्येष्ठ समीक्षक वि.पां. दांडेकर शाहिरी काव्याबद्दल मत व्यक्त करतात की, 'मराठ्यांचे मनगट, मराठ्यांचे मन भावभावना आचार विचार या सर्वांचे निखळ प्रतिबिंब लावणी व पोवाड्यातून उत्तमपणे उमटताना दिसतात.' लावणी हा काव्यप्रकार पूर्णतः शृंगारिक आहे असेही म्हणता येणार नाही. काही लावण्या भक्तीपर, वात्सल्यपर, वीररसयुक्त होत्या. श्रीधर कृष्ण कुलकर्णी उर्फ पठ्ठे बापूराव, भाऊ फक्कड, दगडू बाबा साळी यांनी लावणी हा काव्यप्रकार जनमानसात रुजवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. ज्येष्ठ कवी बशीर मोमीन कवठेकर यांनी उत्तम लावणी कशी असावी याचे जणू मापदंड घालून दिले होते.

समीक्षक म.वा. धोंड यांच्या मते, 'शोभिवंत, सुभग रचना या अर्थाने शाहिरांनी 'लावणी' हा शब्द वापरला असावा.' एकंदरित स्त्रीसौंदर्य, तिची अदाकारी, तिची नजाकत लावणीतून प्रतिबिंबित होते. यावरून लावण्याचा लवलेश असलेली लावणी असेही रुढ झालेले वाटते. संत साहित्यातील गवळणी, विरहणीतील भावभावना लावणीच्या जवळ जाणाऱ्या वाटतात. लावणी केवळ मनोरंजनाचे काव्य असेही म्हणून चालणार नाही; तर काही लावण्यातून देशभक्ती, निष्ठा, नैतिकता , आचार विचाराचा संस्कार केला गेला आहे.

शाहीर प्रभाकर, राम जोशी, होनाजी बाळा अनंत फंदी परसराम सगनभाऊ यांनी तर लावणीही मनामनात रुजवली. शहिरांच्या शाहिरीतून बहरली लावणी - शाहीर अनंत फंदी यांनी बाजीरावाच्या काळातील समाजाचे केलेले वर्णन मोठ्या धाडसाने आपल्या लावणीतून व्यक्त झाले आहे.

**' पतिव्रता आहे उपाशी मरती तिला मिळेना सावली**
**चंचलनार बांधीत असे नवे घर दरसाली'....**

अनंत फंदीच्या या लावणीतून समाजवास्तवता थेट काळजाला जाऊन भिडते. सामाजिक आशय आपल्या लावण्यातून त्यांनी अलगदपणे अभिव्यक्त केला आहे. अनंत फंदीची 'चंद्रावळ' ही शृंगारिक लावणी लोकप्रिय झालेली दिसून येते.

राम जोशी यांची प्रसिद्ध असलेली सुंदरा मनामध्ये भरली ही लावणी सौंदर्याचा खराखुरा अविष्कार वाटतो. ताल, सूर, लयात ठसकेबाज वाटणारी ही लावणी आजही जनमानसांच्या ओठावर सहजपणे रेंगाळते.

**'सुंदरा मनामध्ये भरली जरा नाही ठरली**
**हवेलीत शिरली मोत्याचा भांग'.....**

हे स्रीसौंदर्याचे आलेले वर्णन म्हणजे शृंगाररसाचा उत्तम नमुना आहे. राम जोशी यांनी अध्यात्मिक लावण्याबरोबर शृंगारिक लावण्यांचीही सुंदरपणे रचना केलेली आढळून येते. प्रभाकर या शाहिरानेही आपल्या लावण्यातून शृंगाराचे विविध रंग पुढ्यात मांडले. रसिकांच्या मनोरंजनाची त्यांनी केलेली सोय म्हणजे त्यांच्या शृंगारिक लावण्या होत.

**'केली मजसाठी रंगीत हवेली खासी**

**छती आरशांची बसविली रंग गुलबासी'....**

ही शृंगारिक लावणी म्हणजे शाहीर प्रभाकर यांच्या कणासक्त गुणांचा उत्तम नमुना आहे. शाहीर सगनभाऊ यांनी शृंगारा बरोबरच नैतिकतेचा संस्कार आपल्या लावण्यातून केलेला दिसून येतो.

**' परनारीशी भाषण करता विचार नाही बरा**

**आली दुनिया उरफाटी फार तुम्ही सावधगिरीने असा'.....**

शृंगारिक लावण्यांचे विश्लेषण करताना समीक्षक अ.ब. कोल्हटकर आपले मत मांडतात की 'जी हृदयाला चटका लावते ती लावणी' त्यांचे हे मत काव्यात्म वाटते.

लावणीचे गुणविशेष लक्षात घेतली तर लावणी वाङ्मय प्रकार समजून घ्यायला अधिक सोयीस्कर आहे. शृंगाररसाचे भावाभिनयन विषयबहुलता, सौंदर्यसक्त निरूपण, लयबद्धता, शब्दांची नजाकत.

लावणी हा काव्यप्रकार पूर्व पेशवाईत उदयास आला आणि उत्तर पेशवाईत अधिक बहरत गेला शाहिरांनी लावणीतून विशेषण विशेष्याचा सहजपणे वापर केलेला आढळून येतो उदा. छबीदार सुरत फाकडी, गुलजार नार, फंद, बेबंद, छेलछबेली, नार अलबेली इ.

अशा विविध विशेषण विशेष्यातून लावणीची शब्दकळा रसिकमनावर गारुड करून जाते. आजमितीसही लावणी हा काव्यप्रकार तितकाच लोकप्रिय आहे. पण शृंगार म्हणजे केवळ आंबटशौकिनांचा छंद असे म्हणून चालणार नाही. तर तो निखळ मनोरंजनाचा एक भाग म्हणून रसास्वादात विचारात घ्यावा लागेल. अलीकडे अगदी सुरेखा पुणेकर ते गौतमी पाटील यांच्या लावण्यातून रसिकमन आजही थिरकताना दिसून येते.

**संदर्भ:**

१) नसीराबादकर, ल.रा. ; प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास
२) शेणोलीकर, ह. श्री. ; प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास
३) धोंड, म. वा. ; मराठी लावणी
४) जोग, रा. श्री. ; मराठी वाङ्मयाभिरुचीचे विहंगमावलोकन
५) सहस्रबुद्धे, म.ना. ; मराठी शाहिरी वाङ्मय